ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# लातूर जिल्ह्यातील निलंगा आणि औसा परिसरातील दर्ग्यांचा आढावा : एक अभ्यास

डॉ. लदाफ एस.के.
इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय,
औसा ता. औसा जि. लातूर.

**हजरत खाके -ए- शफा र.अ. :-**



हा दर्गा औसा शहरातील इदगाह मैदानाच्या बाजुस आहे आज या दर्ग्याच्या आजुबाजूला लोक वस्ती अस्तित्वात आहे. या दर्ग्याजवळ नगर परिषदीचे सभागृह आहे. तसेच बाजुला तहसील ऑफिस आहे. या दर्ग्याला जाण्यासाठी ॲप्रोच रोड लागतो. हा दर्गा लहानशा वट्टयावर वसलेला आहे. त्याच्या आत प्रवेश करण्यापूर्वी छोटा कमाणी दरवाजा आहे. त्याला दोन छोटे मिनार आहेत. तसेच दर्ग्याच्या वरच्या बाजुस मोठा घुमट त्याच्यावर चार लहान मिनार आहेत. खाके शफा यांची समाधी आहे. यांच्याजवळ एक मस्जिद आहे. तसेच बाजुला कब्रस्तान आहे. व शेजारी इदगाह मैनादान आहे. औसा शहरातील व ग्रामीन भागातील लोक नवस करण्यासाठी सोमवार,गुरुवार,शुक्रवार यादिवशी हिंदु आणि मुस्लिम दोघेही दर्शनासाठी येतात व तसेच शेहरातील लोक त्यांचा ऊरुस किंवा संदल निघतो.[१]

**हजरत सय्यद सादात र.अ. :-**

हा दर्गा औसा शहरातील वस्तीत आहे. त्याच्या आजुबाजुला लोक वस्ति आहे. त्या लोक वस्तिला खंदक गल्ली म्हणुन ओळखली जाते दर्ग्याच्या समोर औश्याचा ऐतिहासीक किल्ला आहे. दर्ग्याच्या आजुबाजूस कब्रस्तान आहे. त्यांच्या आवारात एक विहीर आहे हा दर्गा सुध्दा चौकोनी आकृतीमध्ये बांधण्यात आला असुन त्याच्यावरती घुमत आहे व घुमदा च्या बाजूला दोन मीनार आहेत. या घुमदामध्ये समाधी आहे. समोरच्या दरवाज्यावर गोल कमानी सारखे कोरले आहे. याही दर्ग्याला सोमवार,गुरुवार,शुक्रवार यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[२]

**हजरत सय्यद तालेबुऱ्हाण र.अ. :-**

हा दर्गा औसा येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या बाजुला आहे. हा दर्गा चौकोणी व वट्याावर बांधण्यात आलेला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या दर्ग्यावर कसल्याच प्रकारचे घुमट अस्थित्वात नाही. हा दर्गा साध्या आवस्थेत आहे. दर्ग्याच्या बाजुला चिंचेचे झाड आहे. त्याला लागुन रिटा जातीचे दोन मोठे झाड आहे. त्याच्या बाजुला तटबंदी आहे या ही दर्ग्याला सोमवार, गुरुवार, शुक्रवार यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[३]

**हजरत खाजा नक्शबंदी र.अ. :-**

हा दर्गा औसा शहरापासून दोन कि.मी. अंतरावर पश्चिम दिशेला आहे. या दर्ग्याला जाण्यासाठी गांधीचौक, सोनार लाईन, महाराज गल्ली, मार्गाने जावे लागते. वाटेत गणपती मंदीर,महा पंत मंरिद , मारुती मंदिर वाहता ओढा नाला बोरवाडण्याची विहीर लागते. हजरत खाजा नक्शबंदी रहमतुल्ला यांचा दर्गा उच्च चौकोनी वट्याावर वसलेले आहे. ती आज साधारण आवस्थेत आहे. या दर्ग्याच्या आवारात तीन कमान आहेत. दोन वडाचे झाड आहेत. व चिंचेचे चार मोठे झाड

आहेत. त्याच बरोबर हिरड्यांचे दोन झाड आहेत.या जागेचे वैशिष्ट्ये म्हणजे येथे फार मोठी यात्रा ऊर्स भरते. यात्रेच्या निमित्ताने दर्शनासाठी लातूर औसा व औसा ग्रामीण भागातील हजारो लोक दर्शन घेण्यासाठी येतात त्यांचा उरुस रमजान ईदच्या दुसऱ्या दिवशी असते आणि दिवशी शहराती सर्व शाळा महाविद्यालयातून सार्वजनिक सुट्टी देण्यात येते एकंदरीत ह्या तारखेला भाविकांची भरपुर गर्दी असते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे यादर्ग्याला हिंदु मुस्लिम एकत्र येत असल्याचे बहुमोल उदाहरण दिसुन येते. ही दर्ग्याला सोमवार, गुरुवार, शुक्रवार यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[४]

हजरत ताजुद्दिन बकक्ष र.अ. औसा शहरातील जुन्या वस्तित असुन त्याच्या शेजारी निलंगा वेस व कुरेशी मोहल्ला ह्या जुन्या वस्तित आहे. हा दर्गा एकुणच आशा वाटयावर वसलेला आहे त्याच्या शेजारी एक तलाव आहे कांही अंतरावर निलंगा वेस आहे तसेच दर्ग्याजवळ एक मस्जिद आहे त्याला मस्जिद ए कुरेश असे म्हणत्तात तसेच एक गोलाकार विहीर आहे. त्याच्याजवळ एक कब्रस्तान आहे. हा दर्गा चौकोन आकृतीमध्य बांधण्यात आला, आसुन वरती घुमट आहे त्या घुमटा मधील समाधी आहे. घुमटाच्या आजुबाजू मध्ये चार मिनार आहेत दर्ग्याला वर जाण्यासाठी पायऱ्या देण्यात आलेल्या आहेत. या दर्ग्याला सुध्दा सोमवार, गुरुवार, शुक्रवार यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[५]

## निलंगा शहरातील दर्गा :-

### हजरत पीर पाशा कादरी र.अ.

हा दर्गा निलंगा शहरातील जुन्या पेठ वस्तीच्या परीसरात आहे. आज या दर्ग्याच्या आजुबाजूला लोकवस्ती आहे. हा दर्गा एकुणच वट्यावर वसलेला आहे. दर्गा चौकोणी आकारामध्ये बांधण्यात आलेला आहे. त्यावर एक घुमट आहे. त्याच्या घुंमटावर मिनार आहे. आत पिरपाशा कादरी यांची समाधी आहे. जाण्यासाठी दर्ग्याच्या आत जाण्यासाठी आठ पायऱ्या लागतात त्याच्या बाजुला एक मस्जिद आहे. समोरील बाजुस कब्रस्थान आहे. त्यांच्या आवारात लिंबाचे झाड आहे. त्याच बरोबर एक चिंचेचे झाड सुध्दा आहे. या दर्ग्याला लातूर जिल्ह्यातील हिंदु मुस्लिम सर्व लोक त्यांच्या दर्शनाला येत असल्याचे दिसुन येतात. त्यांचा उरुस, यात्रा फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. या दर्ग्याला सुध्दा सोमवार, गुरुवार, शुक्रवार यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[५]

### हजरत सय्यद शाह हैदरअली कादरी उर्फ दादापीर :-

यांचा दर्गा निलंगा शहरातील हैदर नगर या भागात आहे. आज सध्या असलेल्या बस स्थानक परिसरात आहे. या दर्ग्याच्या आजु बाजुला लोक वस्ती अस्तित्वात आहे. हा दर्गा एका कट्यावर वसलेला आहे. हा दर्गा सुध्दा चौकोणी आकाराचा असुन त्यावर एक घुमट आहे. वरच्या बाजुस चार मीनार आहेत. त्याच्या बाजुला लिंबाचे झाड आहे. त्याच्या बाजुस कडु बादामाचे झाड सिताफळाचे ,चिंचेचे झाड, वडाचे झाड , दोन बाबळीचे झाड आहेत. यांच्या दर्शनाला जाण्यासाठी दोन्ही बाजुंनी पायऱ्या आहेत. तसेच दोन्ही बाजुस कब्रस्थान आहे. त्याच्या शेजारी किंवा बाजुला एक मस्जिद आहे. तसेच त्यांच्या समोर एक कमान आहे. एकंदरीत या दर्ग्याला फारच महत्त्व आहे. कारण या दर्ग्याला जाण्यासाठी मांसाहारी जेवण चालत नाही असे लोकांच्या वक्तव्यातुन व मुलाखतीतुन जाणवले. तसेच महत्त्वाचे कारण त्यांच्या दर्ग्याला जर मनापासुन प्रार्थना केली तर आपली इच्छा पुर्ण होते.यांचा सुध्दा ऊरुस निघतो त्यांच्या दर्शनाला हिंदु मुस्लिम एकत्र येत असल्याचे दिसुन येते. सोमवारी गुरुवारी शुक्रवारी उदबत्ती किंवा प्रार्थनेसाठी लोक येत असल्याचे दिसुन येते. [६]

### हजरत सय्यद शमशोद्दीन सर्वर र.अ. :-

हा दर्गासुध्दा निलंगा शहरातील जुन्या लोक वस्तीत आहे. या भागाला मुजावर गल्ली म्हणुन ओळखली जाते. या दर्ग्याला आजुबाजुला लोकवस्ती आहे. हा दर्गा सध्या आवस्थेत आहे म्हत्तवाची बाब म्हणजे जमीनीवर आहे. लहान दोन छोटे मिनार आहेत. त्यांच्यावर चिंचेचे झाड आहे. समोर कब्रस्तान आहे. त्याच्या आजुबाजुला एक मस्जिद आहे. त्याला मिनार आहेत. आणि लहान दरवाजा सुध्दा आहे. एकंदरीत हा दर्गा जुन्या लोकवस्तित असुन दोन्ही धर्मातील भावीक येत असल्याचे म्हटले जाते. त्यांची यात्रा ऊर्स भरतो.याही दर्ग्याला सोमवार गुरुवार,शुक्रवारी यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[७]

### सय्यद माँ चाँद साहेब र.अ. :-

हा दर्गा निलंगा शहरात आहे. ते गावाच्या बाहेर आहे. ते गव्हाण रोडवर आहे. हा दर्गा सर्वसाधारण आवस्थेत आहे. हा एक दगडाच्या वट्यावर वसलेला आहे. त्यांच्या दर्गाच्या आवारात पंधरा झाड , निलगिरीचे सहा झाडे , बाबळीचे

चार झाडे , लिंबाचा एक झाड आहे. तर उजव्या बाजुस कब्रस्थान आहे.याही दर्ग्याला सोमवार गुरुवार,शुक्रवारी यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[८]

**हजरत अलकशा बाबा र.अ. :-**

हा ही दर्गा निलंगा शहरात आहे. परंतू गावाच्या बाहेर आहे. या दर्ग्याला जाण्यासाठी तीन रस्ते आहेत. हा दर्गा अत्यंत साध्या आवस्थेत आहे. या दर्ग्याच्या समाधीला चौकोणी लोखंडी जाळी बसविण्यात आली आहे. आत मध्ये चिंचेचे माठे झाड आहे. आजुबाजुने लिंबाचे झाड आहे. व कडव्या बादामाचे झाड आहे. याही दर्ग्याला सोमवार गुरुवार,शुक्रवारी यादिवशी मोठ्या संख्येने भाविक दर्शनाला येत असल्याचे म्हणटले जाते.[९]

**सारांश :-**

लातूर जिल्ह्यातील निलंगा, औसा, तालुक्यातील सुफी संप्रदायामुळे जनतेचे धार्मीक एकात्मता , राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाल्याचे दिसुन येते कारण मध्ययुगीन कालखंडात कि परिस्थिती दिसुन आली परंतु एकुणीसाव्या शतकात ह्या जिल्ह्यात राष्ट्रीय एकात्मता सांम्प्रदायीक एकात्मदा प्रस्तावीत झाल्याचे दिसुन येते. आज ही भावीक हिंदु , मुस्लिम सोमवारी, गुरुवारी, शुक्रवारी दर्शनासाठी येत असल्याचे दिसुन येते. तसेच संदल उरुस यात्रा , नवस बोलणे , अशा अनेक धार्मीक कल्पना सुध्दा आजच्या एकिसाव्या शतकात सुध्दा आपल्याला दिसुन येत असल्याचे आढळुन आले. प्रत्यक्ष सर्वेतुन असे निदर्शनास आले. भावीक अजुन सुध्दा दर्ग्याला येत असल्याचे दिसुन आले आहे.

**संदर्भ :-**

१. प्रत्यक्ष सर्वेक्षण १६ फुब्रुवारी २०१९
२. प्रत्यक्ष सर्वेक्षण १६ फुब्रुवारी २०१९
३. प्रत्यक्ष सर्वेक्षण १६ फुब्रुवारी २०१९
४. प्रत्यक्ष सर्वेक्षण १६ फुब्रुवारी २०१९
५. प्रत्यक्ष सर्वेक्षण १६ फुब्रुवारी २०१९
६. प्रत्यक्ष सर्वेक्षण २३ फुब्रुवारी २०१९
७. प्रत्यक्ष सर्वेक्षण २३ फुब्रुवारी २०१९
८. प्रत्यक्ष सर्वेक्षण २३ फुब्रुवारी २०१९
९. प्रत्यक्ष सर्वेक्षण २३ फुब्रुवारी २०१९
१०. प्रत्यक्ष सर्वेक्षण २३ फुब्रुवारी २०१९
११. प्रत्यक्ष सर्वेक्षण २३ फुब्रुवारी २०१९

**संदर्भ ग्रंथ :-**

१. हिस्ट्री ऑफ सुफीजम - रुजवी सय्यद तहत दिल्ली
२. ताजिया अवलिया ऐ दक्कमन - अब्दुल जब्बार मलकापूर
३. सुहानी हयात - काझी वही अजीज
४. सुहान बुजरगाण दीन - सय्यद पीर
५. वाकिया ते -ममलेका ऐ विजापर - बशीरोद्दीन अहेमद दिल्ली.